**नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात "महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र (Maharashtra Institution for Transformation-MITRA)" ही संस्था स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र. नीतिआ-२०२२/प्र.क्र.३७(भाग-१)/का-१४१२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दि. ११ नोव्हेंबर, २०२२

**प्रस्तावना :-**

भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत "**विकसित भारत- भारत@२०४७ (India@2047)"**करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. यामध्ये सन २०२५-२६ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. तसेच, सन २०३० पर्यंत शाश्वत विकास उद्दिष्टे सुध्दा साध्य करण्याचा भारत सरकारचा मानस आहे. विकसित भारताची ही उद्दिष्टे साध्य करीत असताना भारतातील राज्यांना सुध्दा सन २०४७ पर्यंत संपूर्णपणे विकसित होणे गरजेचे आहे. यादृष्टीने महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२७ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत ३.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे मुख्य ध्येय आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये राज्याची अर्थव्यवस्था ही सर्वात मोठी आहे. भारताच्या सकल उत्पन्नामध्ये (GDP) राज्याचा वाटा १५% आहे.

विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी भारत सरकारमार्फत कार्यरत असलेल्या नीति आयोगाच्या (National Institution for Transforming India) धर्तीवर राज्यामध्येही अशा संस्थेची स्थापना करण्याबाबत नीति आयोगाकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. State Institution for Transformation चे गठन करण्याच्या दृष्टीने मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नीति आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर आयोजित केलेल्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने दि. २० ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत '**मित्र**'च्या स्थापनेबाबतचा प्रस्ताव

सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात “महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र (Maharashtra Institution for Transformation- MITRA)” स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. नीति आयोगाच्या धोरणाशी सुसंगत मात्र राज्याच्या गरजांची दखल घेत खाजगी क्षेत्र व अशासकीय संस्थांच्या सहभागाद्वारे राज्याचा जलद आणि सर्वसमावेशक विकास साधणे हा 'मित्र' च्या स्थापनेचा हेतू आहे.

२. **“मित्र” ची कार्ये खालीलप्रमाणे आहेत :-**

२.१ राज्याच्या विकासाला धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारा विचार गट (Think-Tank) म्हणून कार्य करेल.

२.२ राज्याचे निर्धारित उद्दीष्ट साध्य करण्याच्या हेतूने शासनाच्या विविध विभागांना सक्षम करण्यासाठी उपाययोजना करणे.

२.३ विविध विभाग, भारत सरकार, नीति आयोग, सिव्हिल सोसायटी, विविध अशासकीय संस्था तसेच खाजगी व्यावसायिक संस्था यांच्यात संवाद घडवून आणून विकासाच्या नवीन उपाययोजना सुचविणे.

२.४ 'मित्र'द्वारे कृषि व संलग्न क्षेत्र, आरोग्य व पोषण, शिक्षण, कौशल्य विकास व नाविन्यता, नागरीकरण व बांधकाम क्षेत्र विकास आणि भूमी प्रशासन, वित्त, पर्यटन आणि क्रीडा, ऊर्जा संक्रमण आणि वातावरणीय बदल, उद्योग आणि लघु उद्योग, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, पूरक सेवा व दळणवळण या १० क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करणे. तसेच पर्यावरण, वने आणि वन्यजीव संरक्षण या क्षेत्रांवर देखील विशेष लक्ष देणे.

२.५ या क्षेत्रांच्या प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी पूरक असणारे नावीन्यपूर्ण क्षेत्र-ड्रोन टेक्नॉलॉजी, कृत्रिम बुध्दिमत्ता (Artificial Intelligence) व मशिन लर्निंग, Internet of Things

(IOT), Cloud Computing, सायबर सुरक्षा (Cyber Security), Robotics, GIS, Block chain यांचा वापर करणे.

२.६ आकांक्षित तालुका / शहरे उपक्रम राबविणे. या उपक्रमाद्वारे तुलनेने कमी प्रगती असलेल्या तालुका / शहरांमध्ये नियोजनबध्द कार्यक्रम / योजना राबविणे तसेच त्यांच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे.

२.७ राज्य सरकारला आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आणि सीएसआर ट्रस्ट फंड यांच्याकडून विकासात्मक उपक्रमांसाठी राज्य शासनाच्या मालमत्तेचे मुद्रीकरण (Asset Monetisation) आणि सवलतीचा वित्तपुरवठा यांसारख्या नाविन्यपूर्ण साधनांव्दारे अर्थसंकल्पबाह्य संसाधने उभारण्यासाठी सल्ला देणे.

२.८ राज्य शासनाच्या विविध विभागांना मदत करीत असतांना स्थानिक पातळीवरील नियोजन आणि विकासात्मक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी जिल्ह्यांना डेटा ॲनालिटिक्स माध्यमातून सहाय्य करणे. अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी परिणाम-आधारित रिअल-टाइम मुल्यांकनाच्या माध्यमातून मदत देणे आणि समवर्ती अभिप्राय प्रदान करणे.

३. **'मित्र' ची संघटनात्मक रचना** :-

**३.१ नियामक मंडळ** : नीति आयोगाच्या धर्तीवर **'मित्र'**मध्ये मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे नियामक मंडळ कार्यरत राहील :-

| अ.क्र. | पदाधिकारी/अधिकाऱ्याचे पदनाम | धारण केलेले पद |
|---|---|---|
| १ | मा. मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| २ | मा.उप मुख्यमंत्री/ मा.मंत्री (वित्त व नियोजन) | सह अध्यक्ष |
| ३ | शासनाने नामनिर्देशित केलेले उपाध्यक्ष (२) | उपाध्यक्ष (२) |
| ४ | मुख्य सचिव | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ६ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ७ | तज्ञ व्यक्ती (६ - त्यापैकी ३ वैधानिक विकास मंडळाचे प्रतिनिधी) | सदस्य (६) |
| ८ | मुख्य कार्यकारी अधिकारी, 'मित्र' | सदस्य सचिव |

**नियामक मंडळाची कार्यकक्षा** :-

**(१)** नियामक मंडळ '**मित्र**'ला महत्वाचे प्रकल्प आणि तसेच योजनांबाबत आढावा घेऊन मार्गदर्शन करेल तसेच '**मित्र**'चे काम राज्य शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टानुसार करण्याच्या दृष्टीने योग्य सूचना देईल.

**(२)** नियामक मंडळाची बैठक वर्षातून किमान एकदा, सर्वसाधारणपणे नीति आयोगाच्या नियामक मंडळाच्या बैठकीच्या एक महिना आधी, आयोजित करण्यात येईल. तसेच, नियामक मंडळाचे अध्यक्ष आवश्यकतेनुसार विशेष बैठक बोलावू शकतील.

**३.२ कार्यकारी मंडळ** :- '**मित्र**'च्या दैनंदिन कामकाजाचे संनियंत्रण करण्याकरिता १२ सदस्यांचे कार्यकारी मंडळ गठीत करण्यात येईल. कार्यकारी मंडळाची रचना पुढीलप्रमाणे राहील :-

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्याचे पदनाम** | **धारण केलेले पद** |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २ | विकास क्षेत्र प्रमुख (Sectoral Experts) (१०) | सदस्य (१०) |
| ३ | संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय | सदस्य |

**निवड समिती :-** '**मित्र**'चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची निवड मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री/मा.मंत्री (वित्त आणि नियोजन) आणि मुख्य सचिव यांचा समावेश असलेल्या निवड समितीमार्फत करण्यात येईल. तसेच विकास क्षेत्र प्रमुख (Sectoral Experts) यांची निवड नीति आयोगाने त्यांच्या विकास क्षेत्र प्रमुखांसाठी विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या धर्तीवर करण्यात येईल. याकरिता आवश्यकतेनुसार अधिसूचना निर्गमित करण्यात येईल.

**कार्यकारी मंडळाची कार्यकक्षा :-**

(१) '**मित्र**'चे कार्यकारी मंडळ नियामक मंडळाच्या मार्गदर्शन व सूचनांच्या आधारे विविध प्रकल्प आणि योजनांची आखणी करेल. तसेच '**मित्र**'च्या विविध सहभागी संस्था, राज्य शासनाचे विविध विभाग तसेच संबंधित शासकीय/अशासकीय संस्था व यंत्रणा यांच्यासोबत कार्यकारी मंडळ '**मित्र**'द्वारे आखण्यात आलेला कार्यक्रम आणि संकल्पनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समन्वय साधेल.

(२) कार्यकारी मंडळ '**मित्र**'च्या प्रभावी कामकाजासाठी लागणारी सर्व संसाधने उदा. निधी, मनुष्यबळ, तंत्रज्ञान तसेच इतर सोईसुविधा उपलब्ध करुन देईल. कार्यकारी मंडळाची वर्षातून किमान चार वेळा बैठक आयोजित करण्यात येईल.

**४. संचालन आणि प्रशासन :-**

'**मित्र**'मार्फत राबविले जाणारे कार्यक्रम, संशोधन इत्यादीकरिता संचालक-उपक्रम, संचालक-संशोधन व संचालक-तंत्रज्ञान या ३ शाखा निर्माण करण्यात येतील. तसेच, या संस्थेचे अंतर्गत कामकाज हाताळण्यासाठी संचालक-प्रशासन व मनुष्यबळ आणि संचालक-वित्त अशा २ प्रमुख शाखा निर्माण करण्यात येतील. अशाप्रकारे संचालन व प्रशासनाकरिता एकूण ५ शाखा कार्यरत राहतील.

**५. विकास क्षेत्र विशेषज्ञ :-** परिच्छेद २.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे '**मित्र**'अंतर्गत १० विकासक्षेत्र कार्यरत असतील. या विकास क्षेत्रांकरिता धोरण / तंत्रज्ञान विषयातील तज्ञ, विशेषज्ञ असलेले क्षेत्र प्रमुख, वरिष्ठ सल्लागार, संशोधन अधिकारी व यंग प्रोफेशनल यांची निवड व नियुक्ती नीति आयोगाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येईल.

**६. राज्य डेटा प्राधिकरण** :-

विविध प्रशासकीय विभागांकडून '**मित्र**'ला प्राप्त होणारी माहिती/विश्लेषण उपलब्ध करून देण्याकरिता राज्य स्तरावर राज्य डेटा प्राधिकरण (State Data Authority) निर्माण करण्यात येईल. राज्य डेटा प्राधिकरणाद्वारे GIS आणि Data Analytics चा वापर करुन पुराव्यांवर आधारित धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी विविध विभागांकडून तसेच त्रयस्थ यंत्रणांकडून केलेल्या सर्वेक्षणाची माहिती प्राप्त करणे, तिचे संस्करण करणे व नियंत्रण करणे शक्य होईल. राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये वापरण्यात येणाऱ्या सॉफ्टवेअर प्रणालीद्वारे मोठ्या प्रमाणावर डेटा तयार होतो. राज्य डेटा प्राधिकरण हे Data Sharing, Data Access आणि Data Protection संबंधित धोरणे तयार करेल. राज्य डेटा प्राधिकरण हा '**मित्र**'चा महत्त्वाचा भाग असेल आणि संपूर्ण राज्याच्या तयार होणाऱ्या माहितीचा नियंत्रक असेल.

**७. 'प्रादेशिक मित्र'** :-

राज्याच्या विकासात प्रादेशिक समानता आणण्याच्या दृष्टीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता पुनर्गठित करण्यात आलेले वैधानिक विकास मंडळ त्यांच्या वैधानिक कामकाजाव्यतिरिक्त

'**मित्र**' साठी '**प्रादेशिक मित्र**' म्हणूनही महत्वाची भूमिका पार पाडतील. त्या त्या प्रदेशातील अडचणी किंवा समस्या समजून घेऊन मित्राच्या माध्यमातून राज्य पातळीवर सुयोग्य उपाययोजना तयार करण्यात येतील.

**८. पदांची आवश्यकता :-** "मित्र" करिता खालीलप्रमाणे पदे निर्माण करण्यात येत आहेत -

८.१ विकासक्षेत्रांकरिता क्षेत्र प्रमुख, वरिष्ठ सल्लागार, संशोधन अधिकारी व यंग प्रोफेशनल यांची एकूण ६४ पदे निर्माण करण्यात येत आहेत. विकासक्षेत्रनिहाय पदे व मानधनाबाबतचा तपशील **परिशिष्ट-१** नुसार आहे.

८.२ संचालन व प्रशासनाकरिता एकूण ५ शाखा कार्यरत असतील. एकूण ५ शाखांमध्ये २५ अधिकारी / कर्मचारी यांची पदे निर्माण करण्यात येत आहेत. शाखानिहाय पदे तसेच वेतन / मानधन याबाबतचा तपशील **परिशिष्ट-१** नुसार आहे.

८.३ मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयाकरिता ५ अधिकारी / कर्मचारी यांची पदे निर्माण करण्यात येत आहेत. त्यांच्या वेतन / मानधन याबाबतचा तपशील **परिशिष्ट-१** नुसार आहे.

८.४ नियामक मंडळातील शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन उपाध्यक्ष व ६ तज्ञ व्यक्ती यांच्याकरिता मानधन तत्वावर ८ पदे निर्माण करण्यात येत आहेत.

८.५ राज्य नियोजन मंडळातील १५ पदे, मानव विकास आयुक्तालयातील ९५ पदे, अर्थ व सांख्यिकी संचालनालयांतर्गत कार्यरत मुल्यमापन शाखेतील ३२ पदे व शाश्वत विकास ध्येय-अंमलबजावणी व समन्वय केंद्रामधील ७ पदे या १४९ पदांना '**मित्र**'मध्ये समकक्ष पदे निर्माण करणे व आवश्यकता नसलेली पदे निरसित करणेबाबत उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेने स्वतंत्रपणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

**९. भरती प्रक्रिया :-** '**मित्र**'च्या कामकाजासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाची भरती प्रक्रिया नीति आयोगाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या धर्तीवर करण्यात येईल. सर्व पदे ही प्रतिनियुक्तीने/करार पध्दतीने नियुक्त करण्यात येतील. प्रत्येकवेळी पदभरती करताना मराठी/इंग्लिश वर्तमानपत्रात तसेच '**मित्र**'च्या वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल.

**१०.** 'मित्र'करिता प्रस्तावित केलेल्या वेतन व वेतनेतर बाबींवर होणारा आवर्ती व अनावर्ती खर्च भागविण्याकरिता नियोजन विभागांतर्गत स्वतंत्र लेखाशीर्ष घेण्यात येईल.

११. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.६३१/आपुक, दि.११/११/२०२२ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

**१२.** महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२२१११११६५६३७४८१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by NITIN RAMCHANDRA GADRE
Date: 2022.11.14 15:42:53 +05'30'

**(नितीन गद्रे)**

**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति**,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०.मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
११.सर्व मा. मंत्री महोदय यांचे खाजगी सचिव,
१२.सर्व मा. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
१४.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
१५.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहायक,
१६.मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
१७.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१९.सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई,
२०.सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई,
२१.*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई / औरंगाबाद / नागपूर,

२२.*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई / औरंगाबाद / नागपूर,
२३.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / औरंगाबाद / नागपूर,
२४.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
२५.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२६.महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२७.सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
२८. सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी,
२९.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
३०.सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपरिषदा,
३१.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३२.वित्त विभाग (व्यय -८ / अर्थसंकल्प-१६), मंत्रालय, मुंबई,
३३.उप सचिव (का-१४१२), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
३४.सह सचिव / उप सचिव / अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
३५.निवडनस्ती, कार्यासन-१४१२, नियोजन विभाग,
(*पत्राने)

शासन निर्णय क्र.नीतिआ-२०२२/प्र.क्र.३७(भाग-१)/का-१४१२, दि.११ नोव्हेंबर, २०२२ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट-१

**आवश्यक पदे :-**

**१.** विकासक्षेत्र शाखांकरिता खालीलप्रमाणे पदे मंजूर करण्यात येत आहे. विकासक्षेत्राचे प्रमुख म्हणून कार्यकारी मंडळातील विषय/धोरण तज्ञ राहतील. तसेच प्रत्येक विकास क्षेत्राकरिता वरिष्ठ सल्लागार-१, संशोधन अधिकारी-२, यंग प्रोफेशनल्स-२ इतका किमान कर्मचारी वर्ग राहील.

कृषि व संलग्न क्षेत्र, नागरीकरण व बांधकाम क्षेत्र विकास तसेच पायाभूत सुविधा या विकासक्षेत्राकरिता १ संशोधन अधिकारी व यंग प्रोफेशनल अतिरिक्त प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामुळे १० विकासक्षेत्राकरिता खालीलप्रमाणे पदे निर्माण करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | विकास क्षेत्र | विकास क्षेत्र प्रमुख | वरिष्ठ सल्लागार | संशोधन अधिकारी | यंग प्रोफेशनल | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि व संलग्न क्षेत्र | १ | १ | ३ | ३ | ८ |
| २ | आरोग्य व पोषण | १ | १ | २ | २ | ६ |
| ३ | शिक्षण, कौशल्य विकास व नाविन्यता | १ | १ | २ | २ | ६ |
| ४ | नागरीकरण व बांधकाम क्षेत्र विकास आणि भूमी प्रशासन | १ | १ | ३ | ३ | ८ |
| ५ | वित्त | १ | १ | २ | २ | ६ |
| ६ | पर्यटन आणि क्रीडा | १ | १ | २ | २ | ६ |
| ७ | ऊर्जा संक्रमण आणि वातावरणीय बदल | १ | १ | २ | २ | ६ |
| ८ | उद्योग आणि लघु उद्योग | १ | १ | २ | २ | ६ |
| ९ | पायाभूत सुविधा (१) | १ | १ | २ | २ | ६ |
| १० | माहिती तंत्रज्ञान, पूरक सेवा व दळणवळण | १ | १ | २ | २ | ६ |
| | एकूण | १० | १० | २२ | २२ | ६४ |

वरील पदांवर कार्यरत व्यक्तींना प्रतिमाह खालीलप्रमाणे मानधन देण्यात येईल.

| अ.क्र. | पद | प्रतिनियुक्तीने | बाह्यस्त्रोताद्वारे |
|---|---|---|---|
| १ | क्षेत्र प्रमुख | लेव्हल१४ १४४२००-२१८२०० | रु.३.५० लाख |
| २ | वरिष्ठ सल्लागार | एस-२९ १३११००-२१६६०० | रू.३.०० लाख |
| ३ | संशोधन अधिकारी | एस-१५ ४१८००-१३२३०० | रू.१.०० लाख |
| ४ | यंग प्रोफेशनल | -- | रू.७०,०००/- |

कार्यकारी मंडळाचे अशासकीय सदस्य क्षेत्राचे प्रमुख राहतील.

**२. संचालन व प्रशासन :** विकास क्षेत्राशी संबंधित प्रशासकीय कामे तसेच अन्य प्रशासकीय विभागांशी समन्वय साधण्याकरिता संचालक-प्रशासन व मनुष्यबळ/ संचालक-वित्त/ संचालक-उपक्रम/ संचालक-संशोधन व संचालक-तंत्रज्ञान यांच्या अधिपत्याखाली ५ शाखा कार्यरत असतील.

या ५ शाखांकरिता सद्य:स्थितीत खालीलप्रमाणे मनुष्यबळ प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाखा | संचालक | स्वीय सहायक | अवर सचिव | संशोधन अधिकारी | सपोर्ट स्टाफ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रशासन व मनुष्यबळ | १ | १ | २ | - | २ | ६ |
| २ | वित्त | १ | १ | १ | - | १ | ४ |
| ३ | उपक्रम | १ | १ | १ | १ | २ | ६ |
| ४ | संशोधन | १ | १ | - | २ | २ | ६ |
| ५ | तंत्रज्ञान | १ | १ | - | - | १ | ३ |
| | **एकूण** | **५** | **५** | **४** | **३** | **८** | **२५** |

वरील शाखांमध्ये कार्यरत व्यक्तींना खालील वेतनश्रेणीनुसार वेतन/मानधन देण्यात यावे.

| | **प्रतिनियुक्तीद्वारे** | **बाह्यस्त्रोताद्वारे** |
|---|---|---|
| संचालक | एस-२९ १३११००-२१६६०० | रु.३,००,०००/- |
| अवर सचिव | एस-२३ ६७७००-२०८७०० | -- |
| स्वीय सहायक (लघुलेखक निवडश्रेणी) | एस-१६ ४४९००-१४२४०० | रू. ५०,०००/- |
| संशोधन अधिकारी | एस-१५ ४१८००-१३२३०० | रू.१,००,०००/- |
| सपोर्ट स्टाफ | -- | रू.२०,०००/- |

**३.** मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयात खालीलप्रमाणे मनुष्यबळ प्रस्तावित करण्यात येत आहे.

| पदनाम | प्रतिनियुक्तीने | बाह्यस्त्रोताद्वारे |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | लेव्हल १४ १४४२००-२१८२०० | -- |
| सह सचिव | एस-२७ ११८५००-२१४१०० | -- |
| कक्ष अधिकारी | एस-२० ५६१००-१७७५०० | -- |
| स्वीय सहायक (लघुलेखक निवडश्रेणी) | एस-१६ ४४९००-१४२४०० | रू. ५०,०००/- |
| सपोर्ट स्टाफ | -- | रू.२०,०००/- |

**४ नियामक मंडळ :** नियामक मंडळाच्या ८ अशासकीय सदस्यांना प्रति सदस्य वार्षिक रु.५०,०००/- (एकूण रु.४ लक्ष वार्षिक) मानधन देण्यात येईल.

*********